स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

"राज्यशास्त्र विषयांचा संशोधन आराखडा"

संशोधन विषय

"महिला आरक्षण धोरण आणि लाभार्थी महिलांची स्थिती-एक चिकित्सक अभ्यास" (विशेष संदर्भ परभणी जिल्हा परिषद; कालखंड- १९९७ ते २०१७)

विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र या विभागामध्ये राज्यशास्त्र विषयातील आचार्य (Ph.D) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

*** संशोधक***

श्री.भालेराव गंगाधर रामराव.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी

मो.न.९५६१०४२७७४

मार्गदर्शक

डॉ.एस.बी.फड.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज,नांदेड

संशोधन वर्षे :- मार्च -२०१६

"महिला आरक्षण धोरण आणि लाभार्थी महिलांची स्थिती-एक चिकित्सक अभ्यास"
(विशेष संदर्भ परभणी जिल्हा परिषद; कालखंड- १९९७ ते २०१७)

प्रस्तावना:-

भारतामध्ये ७३ टक्के जनता ही खेडयामध्ये राहते, तसेच भारत हा खेडयांचा देश असल्यामूळे खेडयातील प्रतिनिधीत्व करणाऱ्या संस्था म्हणजे पंचायतीराज संस्था होय. या संस्थामध्ये ग्रामीण समाजातील महिलांना आरक्षण दिल्याशिवाय खेडयाचा विकास होणार नाही. हे आरक्षणाचे तत्त्व निश्चित झाले त्याची कायदेशीर अंमलबजावणी करण्यासाठी ७३ व्या घटनादुरुस्तीची नितांत आवश्यकता होती. ग्रामीण भागांतील स्त्री तेथील पुरुषाप्रमाणेच गरिबीची शिकार आहे.पुरुषप्रधान व्यवस्थेची व भांडवलदारी व्यवस्थेची ती बळी ठरली आहे. ती बहुतांश निरक्षर आहे. तिला शेतीवरची लावणी, कापणी, निंदणी, रिंग, रोपलावणी, कापुस वेचणी इत्यादी कामे करावी लागतात.तिला मिळणारी मंजूरी पुरुषापेक्षा कमी आहे. अशाप्रकारे ग्रामीण महिलांचे एक स्वरुप वरील माहितीवरुन समजून येईल. ग्रामीण भागातील स्त्री पुरुषाच्या तुलनेत अनेक क्षेत्रामध्ये मागासलेली आहे. राजकीय क्षेत्रात गांधीना स्त्रियांकडून अनेक अपेक्षा आहेत. राजकारणात स्त्री महत्वाची भुमिका बजावू शकते. ब्रिटीशा विरोधी अहिंसक, असहकार आंदोलनात महिला आघाडीवर आल्या पाहिजे. चरखा,परदेशी कपडयांचा व वस्तुचा विरोध करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेतला पाहिजे असे गांधीना वाटत होते. स्त्रीने सार्वजनिक राजकारणात यावे, पुरूषांच्या बरोबरीने जबाबदारी सांभाळावी, पण सक्तीने राजकारणात प्रवेश करु नये. सार्वजनिक जीवनात जर तिची अप्रतिष्ठा झाली तर तिने आत्मशक्तीच्या सामर्थ्याने जिवन संपवावे अशी सुचना गांधीनी करतात. गांधीजीना स्त्रीयांचे शील चारित्र्य फार महत्वाचे वाटते. सार्वजनिक जीवनातील पुरुषांच्या वर्तनाबद्दलही त्यांचे आकलन वास्तववादी आहे. पण या पुरुषी वर्तनाचे उत्तर ते गांधीवादी पध्दतीने देतात. स्वातंत्र्योत्तर राजकारणामध्ये म. गांधीना वाटणारी भिती खरी ठरत आहे. स्त्रीचे सार्वजनिक जिवन भयंकर असुरक्षित झालेले दिसून येते. आज चारित्र्यसंपन्न महिलाही राजकारणात आहेत. पण पुरुषी उषित मनोवृत्तीला स्त्रीच्या अशा राजकीय यशाचे गमक तिच्या स्त्रीत्वा तच आढळते. त्यामुळे म. गांधी अशा मनोविकृतीचा विरोध आत्मबलाने करण्याचा सल्ला महिलांना देतात.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महिलांना राजकीय विकास घडवून आणण्यासाठी पंचायतीराज संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी आणि महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यासाठी ७३ वी घटना दरुस्ती करण्यात आली. ७३ वी घटना दुरुस्ती करुन महिलांना आरक्षणाला कायदेशीर अधिष्ठान दिले आणि पंचायतीराज संस्थातील महिलांचा सहभाग वाढविण्यास जाणीव पुर्वक प्रयत्न करण्यात आला आहे.

या घटना दुरुस्तीनुसार गेल्या दशकापासून महिला आरक्षणाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. पंचायतीराज संस्थातील ३३ टक्के आरक्षण म्हणजे भारतातील अर्ध्या लोकांचे स्वतंत्र्य आहे. भारतीय समाजातील एक नवे पर्व नवे परिवर्तन होय.

या सामाजिक व राजकीय परिवर्तनामुळे पंचायतीराज संस्थातील राजकारणाला अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले आहे. आज देशातील लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीपेक्षाही पंचायतराज संस्थाच्या निवडणूका हया जनतेच्या व राजकीय पक्षांच्या आकर्षण केंद्र बनला आहे. पाण्यात पडल्यावर पोहायला येतेच तसे राजकारणात पडल्यावर महिला राजकीय अधिकाऱ्यांचा वापर करायला शिकतीलच या सर्वसाधारण

धारणेच्या आधारावर आणि महिला आरक्षणाच्या आधारावर गेल्या दशकापासून महिला मोठया प्रमाणात पंचायतीराज संस्थामध्ये प्रवेशित झालेल्या आहेत. निवडून आलेल्या आहेत. ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदामध्ये आरक्षणातून आलेल्या महिला समिती व जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणातून झ ालेल्या महिला शासन कारभार ही करु लागल्या आहेत. या आरक्षणाचा फायदा घेऊन राजकारणात आलेल्या महिलांची फळनिष्पत्ती काय आढावा घेण्यात आलेली आहे. ही फळनिष्पत्ती महिलांचा राजकीय सहभाग, जाणीव, जागृती, नेतृत्व आणि निर्णयक्षमता इत्यादी घटकांच्या आधारे शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. महिलांच्या राजकीय सहभागाबाबतचा विचार हा १९७५ पासून म्हणजे आंतरराष्ट्रीय महिला वर्षानंतर सुरु झाला. महिलांच्या राजकीय सहभागावर अनेक बाबींचा प्रभाव पडत असतो. त्या संदर्भात अनेक विव्दानांमध्ये एकमत नाही. महिलांच्या राजकीय सहभागाबाबत मिळबेथ व गोयाल म्हणतात सामान्यता परंपरेने राजकारण हे पुरुषाचे क्षेत्र राहिले व महिला त्यात अत्यल्प मिसळलेल्या आहेत. आजच्या आधुनिकीकरणात व कारखानदारीमुळे लिंग भेद कमी झाला असला तरी परंपरेमुळे तो बहुतांशी तो दिसून येतो. तरिही पुरुष मानसशास्त्रीय दृष्टया स्त्रीयांपेक्षा राजकारणात अधिक प्रमाणात सहभागी होतात. खरे पाहता स्वातंत्र्यप्राप्तीनंरचे राजकारण हे सत्तेशी संबंधित असल्यामुळे स्त्रियांसाठी ते अनुकुल नाही. ही महात्मागांधीची भुमिका होती. त्याचा खोलवर परिणाम स्त्रिमनावर झाला. त्यामुळे स्वातंत्र्यलढयाप्रमाणे राजकारणात स्त्रिया हिरिरीने आल्या नाही. असा आक्षेप काही स्त्रीवादी घेतांना दिसतात. १९९६ साली संसद व राज्यांच्या विधिमंडळात स्त्रियांना राखीव जागा ठेवण्यासाठी कायदा करण्याची मागणी देशातील महिलांच्या गटांनी केली त्या वेळी केंद्रात सत्तेवर असलेल्या संयुक्त आघाडीच्या किमान सहमतीच्या कार्यक्रमात ही मागणी समाविष्ठ करण्यात आली. घटनेतील ८व्या दुरुस्तीव्दारे कायदेशील बदल करण्याची संयुक्त आघाडीच्या सरकारची तयारीही होती. पण या तरतुदीला असलेला प्रखर विरोध त्या वेळी प्रथम उघड झाला. सहभाग प्रधान लोकशाहीमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात लोकांचे प्रतिनिधीत्व असणे आवश्यक असते. पण भारतामध्ये पुरुषप्रधान संस्कृती मुळे महिलांचा सहभाग अल्प प्रमाणात होता. हा सहभाग वाढविण्यासाठी महिलांना पंचायतीराज संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षण देण्यात आले. त्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणात वाढला आहे. तसेच ७३ व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतीराज संस्थांना ज्यादा अधिकार व घटनात्मक दर्जा प्राप्त झाल्यामुळे पंचायतीराज संस्थांच्या राजकारणाला आधिकच महत्व प्राप्त झाले. त्यामुळे पक्षविरहीत पंचायतीराजची कल्पना संपुष्ठात आली. आणि पंचायतीराज संस्था हया राजकीय पक्षाच्या राजकारणांचे अड्डे बनल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था ज्या पक्षा कडे जातील त्या पक्षाकडे तेथील विधानसभा व लोकसभेची जागा जाते असे सुत्र बनले आहे.

*राजकारणातील लाभार्थी महिलाः-

महिलांचा पुरुषानच्या प्रमाणामध्ये राजकारणामध्ये सहभाग वाढवण्यासाठी ७३ वी, ७४ घटनादुरुस्ती करुन ३३ टक्के महिलांना पंचायतराजमध्ये जागा देण्यात आल्या. त्या नंतर महाराष्ट्र राज्याने २०११ मध्ये महिलांना पंचायतराज मध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले. या सर्व आरक्षणाचा लाभ घेऊन महिला स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये निवडून येऊ लागल्या. सदरील संशोधनामध्ये परभणी जिल्हा परिषदेमध्ये जिल्हापरिषद सदस्य म्हणून निवडून आलेल्या महिलांनंतर आपल्या कार्यकाळ संपल्यानंतर त्या दुसऱ्यांदा राजकारणामध्ये प्रवेश करतात किंवा नाही? या विषय अध्ययन करण्यात येईल. तसेच त्या भविष्यामध्ये

कोणत्या स्वरुपाचे कार्य करतात. भविष्यामध्ये त्यांना राजकारणात प्रवेश करण्याची इच्छा आहे. पण त्यांना अनेक अडचणीना सामोरे जावे लागते. या विषयी सदरील संशोधनामध्ये अध्ययन करण्यात येईल. त्यांना राजकारणामध्ये दुसऱ्यांदा प्रवेश करण्यासाठी कोण संधी निर्माण करुन देते काय? यांचा शोध सदरील संशोधनामध्ये घेतला जाईल. ज्या महिलां एकदा जिल्हा परिषद सदस्य म्हणून सदरील संशोधनामध्ये म्हटले आहे. अशा लाभार्थी महिलांचे भविष्यामध्ये कोणत्या स्वरुपाचे कार्य करतात. भविष्यामध्ये त्यांना पुन्हा राजकारणामध्ये प्रवेश करण्याची शक्यता आहे काय ?
या सर्वाचा सदरिल अध्ययनामध्ये विचार करण्यात येणार आहे. केवळ राजकिय आरक्षणामुळेच महिलांना राजकारणामध्ये प्रवेश देण्यात आला होता. पण आरक्षणाच्या जागामध्ये बदल
झाल्यामुळे त्या महिला राजकारणा मध्ये प्रवेश करत नसतील अशा लाभार्थी महिलांना कोणत्या स्वरुपाचे कार्य करावे लागते. लाभार्थी महिलांना राजकारणामध्ये प्रवेश घेण्यासाठी दुसऱ्यावर अवलंबून राहावे लागते. लाभार्थी महिलांचे भविष्या विषयी काय कार्य व निर्णय असतात तसेच जिल्हा परिषद निवडणूकांमध्ये राजकिय पखाने तिकिट नाकारलयामुळे हया महिला राजकारणामध्ये पुन्हा प्रवेश करु शकत नसतील. लाभार्थी महिलांच्या राजकिय स्थिती विषय सदरील संशोधनामध्ये अध्ययन करण्यात येणार आहे.

*परभणी जिल्हा पार्श्वभूमी :-

१ मे १९६२ साली महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन परभणी हा जिल्हा महाराष्ट्र राज्याचा घटक जिल्हा बनला. परभणी हा जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या आग्नेय दिशेला येतो. १ मे १९९९ या दिवशी परभणी जिल्हाचे विभाजन होऊन परभणी व हिंगोली असे २ जिल्हे बनले. परभणी हे जिल्हयाचे मुख्यालय असून त्यात ९ तालूक्यांचा समावेश होतो. परभणी, जिंतूर, सेलू, पाथरी, गंगाखेड, पालम, पुर्णा, सोनपेठ व मानवत हे तालूके आहेत. जिल्हाच्या पुर्वेला नांदेड व हिंगोली, दक्षिणेला लातूर व बीड पश्चिमेला बीड व जालना तर उत्तरेला हिंगोली जिल्हा आहे.

परभणी जिल्हयचे क्षेत्रफळ ६५४१ चौ.की.मी एवढी आहे. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशिवरुन राज्यातील इतर जिल्हा परिषदांप्रमाणे परभणी जिल्हा परिषदेची स्थापना १ मे १९६२ साली करण्यात आली मुंबई वगळता १ मे १९६२ हा सर्व जिल्हा परिषदांचा स्थापना दिन आहे. परभणी जिल्हातील जिल्हापरिषद मधिल वर्ष १९९७ ते २०१७ पर्यंतच्या तीन निवडणूका अभ्यासासाठी निवडल्या आहेत. यातील निवडणुकामध्ये निवडून आलेले एकूण सदस्य २१६ आहेत. त्यापैकी पुरुष सदस्य १२८ आहेत, लाभार्थी महिला ८८ आहेत. अशा ८८ राजकीय लाभार्थी महिलांनाच सदरील संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे. परभणी जिल्हयातील लाभार्थी महिलांची राजकारणामध्ये कशा प्रकारची स्थिती असते. अशा राजकारणाचा अनुभव असलेल्या लाभार्थी महिलांचा सदरील संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

*संशोधनाच्या समस्या :-

१) आरक्षणाच्या जागामध्ये बदल झाल्यामुळे लाभार्थी महिला दुसऱ्यानंदा राजकारणामध्ये प्रवेश करत नसतील का? या समस्यांचा अभ्यास करणे.

२) भविष्यामध्ये राजकारणात प्रवेश प्राप्त करण्यासाठी लाभार्थी महिलांना कोण कोणत्या समस्यांनचा सामना करावा लागतो?

३) जिवन जगत असतांना लाभार्थी महिलांना कोण- कोणत्या समस्या निर्माण होत असतात. या समस्यानचा अभ्यास करणे.

४) कोण-कोणत्या समस्या मुळे लाभार्थी महिलां राजकारणामध्ये प्रवेश करत नाही या समस्यानचा अभ्यास करणे.

५) राजकिय पक्षाने तिकिट नाकरल्यामूळे लाभार्थी महिला राजकारणात सहभागी होवू शकत नाही या समस्यांनचा अभ्यास करणे.

६) लाभार्थी महिला कोणत्याही स्वरुपाचे कार्य किंवा काम करत असतांना त्यांना कोणत्या समस्या येत असतात.

७) लाभार्थी महिलांना कौटुंबीक स्वरुपाच्या कोण- कोणत्या समस्या निर्माण होतात आणि त्या समस्यांनचा लाभार्थी महिला कशा प्रकारे सामना करतात.

संशोधनाची उद्दिष्टे/ उद्देश :-

१) भविष्यामध्ये राजकारणात प्रवेश मिळविण्यासाठी लाभार्थी महिलांना कोणकोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो? याचा शोध घेणे.

२) लाभार्थी महिला भविष्यामध्ये कोणत्या क्षेत्रामध्ये कार्य करत असतात. याचा अभ्यास करणे.

३) एक वेळेस आरक्षणाचा लाभ घेतल्या नंतर दुसऱ्यावेळी आरक्षणाच्या जागामध्ये बदल झाल्यामूळे लाभार्थी महिला राजकारणात टिकून राहतात काय? याचा शोध घेणे.

४) राजकीय आरक्षणाच्या लाभासाठीच लाभार्थी महिला राजकारणामध्ये सहभागी होत असतात काय? व कौटुंबिक दबावामुळे राजकारणात प्रवेश घेतात काय? पण भविष्यामध्ये त्यांची काय स्थिती असते. याचा शोध घेणे.

५) भविष्यामध्ये लाभार्थी महिलांना राजकारणात प्रवेश प्राप्त करुन देण्यासाठी कोण प्रयत्न करत असतात व भविष्यामध्ये लाभार्थी महिलांचा राजकारणाविषयी दुष्टिकोन अभ्यासणे. लाभार्थी महिला भविष्यातील आरक्षणाच्या वेळी लाभार्थी महिला किंवा नाही. याचे अध्ययन करणे व

भविष्यामध्ये लाभार्थी महिलांना राजकारणात टिकूण राहण्यासाठी कोणत्या अडचणी येतात याचा शोध घेणे.

*संशोधनाची गृहितके :-

१) लाभार्थी महिला भविष्यामध्ये कौटुंबीक कार्य करत असतील.
२) दुसऱ्या वेळेस राजकीय पक्षाने तिकीट नाकारल्यामुळे लाभार्थी महिला राजकारणात प्रवेश करु शकत नसतील.
३) भविष्यामध्ये राजकारणात प्रवेश प्राप्त करण्यासाठी लाभार्थी महिलांना अनेक समस्यानचा सामना करावा लागत असेल.
४) आरक्षणाच्या जागेमध्ये बदल झाल्यामुळे लाभार्थी महिलांना राजकारणात टिकून राहण्यास अडचणी येत असतील.
५) भविष्यामध्ये लाभार्थी महिलांना राजकारण प्रवेश प्राप्त करण्यासाठी कुंटुब प्रयत्न करत असेल.भविष्यातील लाभार्थी महिलांना राजकारणाविषयी सकारात्मक दृष्टिकोण असु शकतो.
६) राजकिय आरक्षणामुळेच लाभार्थी महिला राजकारणात प्रवेश करत असतील.

*संशोधनाचे महत्व :-

जिल्हा परिषद महिला सदस्यांनचा ज्यावेळी कालावधी संपतो त्यानंतर दुसऱ्यावेळी हया महिला राजकारणामध्ये सहभाग घेत नसतात आशा महिलांना राजकिय लाभार्थी महिला म्हणून सदरील संशोधनामध्ये संबोधले आहे. अशा लाभार्थी महिलांना भविष्यामध्ये कोणत्या स्वरुपाचे कार्य करत असतात. त्यांची भविष्यामध्ये काय स्थिती असते. त्या पुन्हा भविष्यामध्ये संधी मिळाल्यास राजकारणामध्ये प्रवेश करण्यास इच्छूक आहेत का? अशा लाभार्थी महिलांची राजकारणामधील स्थिती जाणून घेऊन त्या लाभार्थी महिलाना राजकारणामध्ये पुन्हा प्रवेश मिळावा त्यांना राजकारणामधील ज्या अडचणी येतात त्या समाज व प्रशासनासमोर मांडाव्यात. त्यांची राजकारणा मधील स्थिती ही कशा प्रकारची आहे. ती सर्वांन समोर घ्यावी. त्यांना देखिल पुरुषाणच्या बरोबरीने स्वाभीमानाने राजकारणात कार्य करता आले पाहिजे.अशा प्रकारे सदरील संशोधनाचे महत्व असेल.

*संशोधनाची अध्ययन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी शास्त्रीय पध्दतीने ऐतिहासिक, विश्लेषणात्मक किंवा वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब केलेला आहे. सदरील संशोधन प्रथम व दुय्यम माहितीवर आधारीत आहे.सदरील संशोधनाचे अध्ययन करत असतांना त्याचे संकलन केले जाईल त्याचे प्रकार पाडले जातात त्यामध्ये १) प्राथमिक साधने **२) व्दितीय साधने इ.**

१) प्राथमिक स्त्रोतामध्ये - निरिक्षण, मुलाखत, अनुसूची

२) व्दितीय स्त्रोतामध्ये - संदर्भ पुस्तके

३) सार्वजनिक प्रवेश - प्रकाशित प्रलेख, रेकॉर्ड, प्रकाशित आकडेवारी, वर्तमानपत्रे, साप्ताहिके इत्यादी.

सदरील संशोधनामध्ये साख्यिकीय पध्दतीचा उपयोग करण्यात येईल, प्रस्तुत संशोधनामध्ये कॉप्युटरचा महत्वपुर्ण उपयोग करण्यात येईल तसेच वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

*संशोधनाची नमुना निवड पध्दती :-

परभणी जिल्हातील जिल्हापरिषद महिला सदस्यानचा ज्यावेळेस कालावधी समाप्त होतो. त्यानंतर दुसऱ्यावेळी हया महिला राजकारणामध्ये सहभाग घेत नसतात. अशा महिलांना राजकिय लाभार्थी महिला म्हणून संशोधनामध्ये म्हटले जात आहे. परभणी जिल्हातील जिल्हा परिषद वर्ष १९९७ ते २०१७ पर्यंतच्या तीन निवडणुका निवडून आलेले एकूण सदस्य २१६ आहेत. त्यापैकी सदस्य १२८ आहेत. लाभार्थी महिला ८८ आहेत. अशा ८८ राजकिय लाभार्थी महिलांनची निवड जनगणना पध्दतीने केलेली आहे. ८८ लाभार्थी महिलांचा सदरील संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

*संशोधनाची तथ्य संकलन पध्दती :-

सदरील संशोधन विषय अभ्यासण्यासाठी वर्णनात्मक किंवा विश्लेषणात्मक संशोधन आराखडा पध्दती निश्चित केली आहे.

१. प्राथमिक तथ्ये संकलन - प्रस्तूत संशोधनामध्ये परभणी जिल्हातील जिल्हा परिषद सदस्य असलेल्या पण दुसऱ्या निवडणुका मध्ये सहभाग नसलेल्या अशा लाभार्थी महिलांची प्रत्यक्ष मुलाखती लाभार्थी महिलांची निरिक्षण, पध्दतीचा अवलंब करुन तथ्य संकलन केले जाईल. संकलित केलेल्या तथ्यांचा पध्दतशिर, वस्तुनिष्ठ व प्रमाणबध्द अर्थ विशद करुन विश्लेषण करुन लिखित मांडणी केली जाईल.

२. दुय्यम तथ्ये- सार्वजनिक प्रलेख, शासकीय कायदे पुस्तीका विषया संबंधित संदर्भग्रंथ, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके इत्यादी.

*प्रकरणाची रचना :-

प्रकरण पहिले :- प्रस्तावना

प्रकरण दुसरे :- संशोधन साहित्याचा आढावा व संशोधन पध्दती

प्रकरण तिसरे :- पंचायतराज व्यवस्था आणि महिला आरक्षण.

प्रकरण चौथे :- परभणी जिल्हा व महिलांची स्थिती.

प्रकरण पाचवे :- लाभार्थी महिलांची वर्तमानकाळीन परिस्थिती.

प्रकरण सहावे :- लाभार्थी महिलांच्या राजकिय समस्या.

प्रकरण सातवे :- निष्कर्ष, शिफारशी व उपाययोजना

*संदर्भग्रंथ सूची

१) बाल उषा (डॉ.) भारत की महिला स्वतंत्रता सेनानी (१८५७ - १९४७) भारत सरकार : मानव संसाधन विकास मंत्रालय, शिक्षा विभाग - नई दिल्ली, १९८८

२) भागवत कमल, मालती गाडगीळ, शांता केळकर, कुसुम रणदिवे, स्त्री चळवळीची वाटचाल, प्रागतिक पुस्तक प्रशासन, पुणे १९८५

३) प्रा. बालाजी चिरडे, भारतीय इतिहासातील स्त्रिया, निर्मल प्रकाशन, नांदेड पान नं.६२

४) कित्ता, पान नं.६६,६७.

५) दांडेकर शं.वा. भारतीय थोर स्त्रिया, दांडेकर प्रकाशन, पुणे, १९८४

६) प्रा. प्रतिमा इंगोले, आजही स्त्रीचे स्थान दुय्यगच, दिलीप राज प्रकाशन प्रा.लि.पुणे पा. नं ६६, ६७.

७) डॉ. रोहिणी गवाणकर, मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप, आदित्य प्रकाशन पुणे.

८) गवाणकर रोहिणी, मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रुप, आदित्य प्रकाशन पुणे.

९) मुळे अंजली-१९८५ स्त्री चळवळ आणि राजकरण मुंबई : लोकवाडमय गृह

१०) पवार, वैशाली २०१२ महिलांच्या सत्तासंघर्षाची ओळख लातूर : अरुणा प्रकाशन.

११) कोलते पुंडलिक २०१२ पंचायतराज व्यवस्थेत महिलांचा सहभाग- औरंगाबाद : चिन्मय प्रकाशन.

संशोधक

श्री.भालेराव गंगाधर रामराव.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभणी

मो.न.९५६१०४२७७४

मार्गदर्शक

डॉ.एस.बी.फड.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज, नांदेड

मो.न. ९४२१४२५५६७

9